International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.1 September – October 2022

# ग्रंथालयासाठी उपयोगी पडणारी अर्कहार्टप्रणाली व्यवस्थापनाची 18 सूत्रे

**श्री. संजय माने**
ग्रंथपाल, ए. सी. एस. कॉलेज, पलूस
*Corresponding Author - श्री. संजय माने*
**DOI - 10.5281/zenodo.7223526**

***सारांश**:*

*यामध्ये अर्कहार्टप्रणाली व्यवस्थापनाची 18 सूत्रे मांडण्यात आली आहेत त्या सूत्रांशी पंचसुत्रातील साम्य कसे आहे ते सांगण्याचाप्रयत्न केला आहे. वस्तुस्थितीची जाणीव, अर्थशास्त्र सिद्धांत, व्यवस्थापनाच्या मर्यादा व ग्रंथालयाचे महत्व सांगणारे सूत्र कशी आहेत याचे विवेचन करणात आले आहे.*

**प्रस्तावना:**

प्रत्येक व्यक्ती जे काम करत असते त्या मध्ये थोडे फार व्यवस्थापन असतेच. व्यवस्थापन ही संकल्पना सर्व ठिकाणी सर्वकाळात आणि सर्व परिस्थितीत लागू पडणारी असल्याने तिचे स्वरूप सार्वत्रिक आहे असे म्हटले जाते. थोडक्यात 'व्यवस्थापन करणे म्हणजे भविष्याचा अंदाज व नियोजन करणे, संघटन करणे, आदेश देणे, समन्वय करणे आणि नियंत्रण करणे होय'. या हेनरी फेयॉलच्या व्याखेप्रमाणे अनेकानी व्यवस्थापनाबद्दल विचार मांडले आहेत. व्यवस्थाप अनेक ठिकाणी केले जाते त्यानुसार ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये मार्गदर्शन करणारे अनेकांमध्ये डॉ. अर्कहार्ट यांचे नाव घेता येईल की, त्यांनी आज महाकाय संस्थेत रूपांतर झालेल्या ब्रिटीश लायब्ररी डाक्युमेंट सप्ल्यार सेंटर या प्रलेख संचय आणि प्रतिलिपी पुरवणाऱ्या संस्थेचे जनक व तिचे विस्तारक म्हणून डॉ. अर्कहार्ट यांना ग्रंथालय व माहिती सेवाक्षेत्रांत मानाचे स्थान आहे. व व्यापकदृष्टीकोन भविष्याचा वेध घेण्याची क्षमता असलेला उत्तम व्यवस्थापाक म्हणून डॉ. अर्कहार्ट यांचे वर्णन करावे लागेल. स्थापानेच्या वेळी 'नॅशनल लेंडिंग लायब्ररी' असलेली ही संस्था प्रतिलिपी अत्यंत समक्षेतने पुरवली जाणारी जगातील नामवंत संस्था आहे. ही संस्था म्हणजे ग्रंथालय नव्हे, तर ही तिच्या व्यवस्थापनात ग्रंथालय व्यवस्थेची मुळे आहेत, तिचा उपयोग प्रमुख्याने ग्रंथालयांनीच करावयाचा असल्याने त्या अनुषंगाने ग्रंथपालानी व्यवस्थापनात कोणता दृष्टीकोन बाळगला पाहिजे, त्यांचे मार्गदर्शन त्यांनी 18 सूत्रात मांडली आहेत.

डॉ. एस.आर.रंगनाथान यांची पंच सूत्री आपणा सर्वांच्या परिचयाची आहेत ती सूत्रे ग्रंथपालांना मार्गदर्शन ठरलेली आहेत व भविष्यात ही मार्गदर्शक ठरतील. परंतू काही सूत्रास मर्यादा येतात ते म्हणजे डॉ. एस. आर. रंगनाथान यांनी दुसरे सूत्र असे सांगितले की प्रत्येक वाचकास त्याचे पुस्तक मिळाले पाहिजे जर ग्रंथालयामध्ये एकच पुस्तक असेल व दहा वाचक असतील तर प्रत्येक वाचकास हवे तेव्हा पुस्तक मिळणार नाही.

अशा प्रकारे येणाऱ्या अडचणी व मर्यादा ओळखून डॉ. अर्कहार्ट यांनी ग्रंथालयाची 18 सूत्रे मांडली आहेत. ती पुढीलप्रमाणे-

1. ग्रंथालये वाचानकांसाठी आहेत.
2. माहिती प्रतिप्राप्तीच्या ग्रंथालयीन पद्धतीचे अपयश हे सदैव आकलनीय असतेच असे नाही.
3. पुरवठ्याच्या शाश्वतीमुळे मागणी वाढते.
4. वाचकांना त्यांच्या आवडीचे साहित्य निवडण्यास सोपे जावे यासाठी ग्रंथलयानी विविध विभागदर्शक, मार्गदर्शीका पुरविल्या पाहिजेत.
5. वाचकांना हव्या असलेल्या साहित्याच्या उपलब्ध्येवर निर्बंध नसावेत. पण नियम आवश्यक असावेत.
6. ग्रंथालयसेवेसाठी शुल्क आकारले पाहिजे.
7. ग्रंथालयाने तसेच ग्रंथालयाच्या समुच्चयाने किंवा एकाच ग्रंथालयाच्या विविध विभागांनी एकत्रित ग्रंथालयावर होणारा खर्च आणि त्यापासून मिळणारे फायदे याचे भान राखले पाहिजे
8. माहितीचे मूल्य हे सदैव आर्थिक नाही.
9. जस जसा पुरवठा केला जातो तस तसे त्याचे फायदे कमी होतात.
10. पूर्णत्वाच्या नादात किमान गुणवत्तेच्या वस्तूची निर्मिती व कामे राहूनच जातात.
11. एखादे कार्य जसजसे वाढत जाते तसतसा त्याच्या घटकावर होणाऱ्या खर्चाच्या प्रतिघटक खर्चात बचत झाली पाहिजे.
12. ग्रंथालय म्हणजे एक बोट नव्हे.
13. ग्रंथालयाच्या विकासाचे नियोजन करताना वाचकांच्या गरजा बद्दलची वस्तुनिष्ठ माहिती वापरली पाहिजे.
14. नवीन तंत्रज्ञान व पद्धतीचा वापर करताना भविष्याकडे लक्ष ठेवावे.
15. ग्रंथालयातील सर्व सेवकांनी संघ प्रवृत्तीने काम केले पाहिजे.
16. ग्रंथापालाचे पद म्हणजे भरपूर पगार घेऊन कोणतेही उत्तरदायित्व न मानणारे विद्वानास प्रधान केलेले पद नव्हे तर अनेक विद्वानांना त्यांचे काम सुकर आणि सुलभ करण्याचे काम करण्यासाठी ग्रंथालय पद आहे.
17. ग्रंथालय ही समाजाच्या मोलाचे योगदान देणारी संस्था बनू शकते.
18. ग्रंथपालन हे प्रायोगिक शास्त्र आहे.

वरील प्रमाणे डॉ. अर्कहार्ट यांनी 18 सूत्रे ग्रंथालय शास्त्रामध्ये मांडली आहेत त्यामध्ये त्यांची काही सूत्रे डॉक्टर एस. आर. रंगनाथन यांच्या पंचसूत्रीशी साम्य असणारी आहेत तर काही अर्थशास्त्रीय सिद्धांत, व्यवस्थापनाच्या मर्यादा, ग्रंथालय सेवेचे महत्व व वस्तुस्थितीचे भान ठेवणारी सूत्रे त्यांनी काही नियमांना तसेच तत्त्वांना छेद देऊन सूत्रे मांडली आहेत त्या सर्व सूत्रांचे विश्लेषण पुढील आधारे केले आहे.

**पंचसूत्रीतील साम्य:**

डॉ. एस. आर. रंगनाथ यांनी ग्रंथालय शास्त्रातील मांडलेली सूत्रे आणि डॉ. अर्कहार्ट यांनी मांडलेली सूत्रे यांच्यातील काही सूत्रात साम्य आहे ती पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी पहिले सूत्र मांडले की 'ग्रंथ हे उपयोगी असतात'. तर डॉ. अर्कहार्ट यांनी त्यांच्या पहिल्या सूत्रात 'ग्रंथालय वाचकांसाठी आहेत'. त्यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या फक्त सूत्राच्या पुढे जाऊन ग्रंथ हे उपयोगी असतात तर संपूर्ण ग्रंथालयेच वाचकांचे असतात असे मांडले आहे.
2. प्रत्येक वाचकास त्याचे पुस्तक मिळाले पाहिजे आणि वाचक व ग्रंथालयाचा वेळ

वाचला पाहिजे यासाठी प्रयत्न करून यश मिळेलच असे नाही या दोन्ही सूत्रानुसार डॉ. अर्कहार्ट यांनी त्यांचे दुसरे सूत्र असे सांगितले की, वाचकांच्या माहितीच्या गरजा भागवण्यासाठी ग्रंथपालांनी योजलेले उपाय, कुल्प्त्या अनेकदा फसतात त्यामुळे वाचक असमाधानी होतो असे डॉ. रंगनाथांनच्या तिसऱ्या व चौथ्या सूत्राप्रमाणे याही सूत्रात साम्य वाटते.

3. डॉ. अर्कहार्ट यांनी पुरवठ्याच्या शाश्वतीमुळे मागणी वाढते असे सांगितले थोडक्यात ग्रंथालय सेवामुळे वाचकांचे जसजसे समाधान होते तसतसे त्याची मागणी वाढते हे त्यांचे तिसरे सूत्र डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक वाचकास व त्यांचे पुस्तक मिळाले पाहिजे या सूत्राप्रमाणे मांडले आहे.
4. डॉ. अर्कहार्ट यांनी चौथे व पाचवे सूत्र अनुक्रमे वाचकांना त्यांच्या आवडीचे साहित्य निवडण्यास सोपे जावे यासाठी ग्रंथालयांनी विविध विभागदर्शक मार्गदर्शिका पुरवल्याच पाहिजेत व वाचकांना हव्या असलेल्या साहित्याच्या उपलब्धतेवर निर्बंध नसावे पण नियम आवश्यक असावेत ही डॉ. एस. आर. रंगनाथन त्यांनी वाचकांचा व सेवकांचा वेळ वाचला पाहिजे यासाठी जे उपाय सुचविले जातात ते म्हणजेच या सूत्राची मांडणी आहे.

**वस्तुस्थितीची जाणीव:**

डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या सूत्रास साम्य असलेली सूत्रे डॉ. अर्कहार्ट यांनी मांडली त्याचप्रमाणे त्यांनी ग्रंथालयामधील ग्रंथालय सेवक, व्यवस्थापक व वाचक यांना वस्तुस्थितीची जाणीव करून देणारी काही सूत्रे मांडलेली आहेत.

1. डॉ. अर्कहार्ट यांनी दुसरे सूत्र असे म्हटले की वाचकास माहिती मिळवण्यासाठी ग्रंथालयाने जे उपाय, कुल्प्त्या केल्या तरीही काही वेळा वाचक असमाधानी राहतो. तेव्हा व्यवस्थापकांनी सुद्धा जागृत राहिले पाहिजे किंवा वाचकांनी त्या ग्रंथालयात माहिती मिळेलच असे गृहीत धरू नये कारण माहितीचे अजब मिश्रण आहे व दररोज नवनवीन माहिती वाढत असते याची जाणीव त्यांच्या सूत्राने करून दिली आहे.
2. ग्रंथालयाने ग्रंथालय सेवा वेळेवर व योग्य द्यावेत यासाठी त्यांनी शुल्क आकारावे हे क्रांतिकारक सूत्र मांडले कारण फुकट मिळालेल्या ज्ञानाचे वाचकांना महत्व नसते. तेव्हा शुल्क देऊन मिळवलेल्या ज्ञानास महत्त्व असते. पण माहितीचे मूल्य देतो म्हणजे माहितीसाठी देतो असे नाही कारण माहितीचे मूल्य पैशांमध्ये करूच शकत नाही याची वस्तुस्थितीची जाणीव सहाव्या व आठव्या सूत्रानुसार केली आहे.
3. ग्रंथालयांनी ग्रंथालयावर होणाऱ्या खर्चाचे त्याच्या प्रत्येक होणाऱ्या पैशाचे मोजमाप करून त्याचे योग्य फायदे वाचकांना मिळाले पाहिजेत याचे भान ग्रंथालयांनी व त्यांच्या समुच्चयाने लक्षात ठेवले पाहिजे असे सातव्या सूत्रात सांगितले आहे.
4. पूर्णत्वाच्या नादात किमान किरकोळ गुणवत्तेच्या वस्तूची निर्मिती व कामे राहून जातात ते राहून जाऊ नये असे दहाव्या सूत्रात सांगितले आहे.
5. ग्रंथालय हे सर्व बाजूंनी परिपूर्ण असेलच असे नाही त्यासाठी त्यांना इतर ग्रंथालयावर अवलंबून राहावे लागते. त्यावेळी त्यांनी परस्पर सहकार्य वाढवावे असे बाराव्या सूत्रात सांगितले आहे.

6. आज नवनवीन तंत्रज्ञान, पद्धती, माहिती व साहित्य इत्यादी येत असते तेव्हा ग्रंथालयात त्याचा वापर करताना ते लगेच कालबाह्य होणार नाही. त्याचप्रमाणे भविष्याचा विचार करून ग्रंथालयात अशा गोष्टींची वाढ करावी असे चौथ्या सूत्रानुसार जाणीव करून दिलेली आहे.
7. ग्रंथालयातील सर्व सेवकांनी एकसंघ होऊन काम केले पाहिजे तरच ग्रंथालयाचे यश संपादन करता येईल असे पंधराव्या सूत्रात सांगितले. तसेच ग्रंथालयामधील ग्रंथपाल हे पद भरपूर पगार व विद्वानास दिलेले पद नसून विद्वानांना माहिती देणारे पद म्हणजे एक भूषणच असणारे पद आहे असे दोन्ही बाजूने वस्तुस्थितीची जाणीव करून देणारे सोळाव्या सूत्रात सांगितले.

**अर्थशास्त्रीय सिद्धांत:**

पंचसूत्रातील साम्य व वस्तुस्थितीची जाणीव करून देणारे सूत्रे मांडली त्याचप्रमाणे डॉ. अर्कहार्ट यांनी अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून काही सूत्रे मांडली ती पुढील प्रमाणे.

1. मागणी जसा पुरवठा हा अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार त्यांनी पुरवठ्याच्या शाश्वतीमुळे मागणी वाढते त्यानुसार ग्रंथालय सेवा देणारी व्यवस्था करावी असे तिसऱ्या सिद्धांतात म्हटले आहे.
2. तसेच कोणतीही सेवा फुकट देऊ नये त्याचे मूल्य अल्प प्रमाणात तरी आकारावे व ग्रंथालयांमध्ये होणाऱ्या खर्चाचा पुरेपूर उपयोग झाला पाहिजे त्या पद्धतीने खर्च करावा असे सहाव्या आणि सातव्या सूत्रात सांगितले.
3. अर्थशास्त्रात 'उपभोक्ता' सिद्धांत मांडला आहे त्याचप्रमाणे ग्रंथालय सेवेचा जसजसा पुरवठा केला जातो तसतसा त्याचा फायदा कमी होतो हे सूत्र मांडले आहे.
4. ग्रंथालय हे उत्तम प्रकारे असले पाहिजे, परंतु उत्तम प्रकारे ठेवण्याच्या नादात मूळ कार्याचा नाश होणार नाही असे व्यवहारिक व आर्थिक दृष्ट्या दहाव्या सूत्रात सांगितले आहे.
5. डॉ. अर्कहार्ट यांनी 11 व्ये सूत्र हे महत्त्वाचे सूत्र मांडले आहे ते म्हणजे एखादे कार्य जसजसे वाढत जाते तसतसा त्याच्या घटकावर होणाऱ्या खर्चात बचत झाली पाहिजे.

**व्यवस्थापनाच्या मर्यादा/ सिद्धांत:**

ग्रंथालय व्यवस्थापन करीत असताना ते कशाप्रकारे केले जावे त्याचप्रमाणे व्यवस्थापनेत येणाऱ्या अडचणी या सर्व गोष्टींचा विचार करावयास लावणारी सूत्रे डॉ. अर्कहार्ट यांनी मांडली.

1. ग्रंथालयांमध्ये कितीही सेवा दिल्या तर वाचक समाधान होईलच असे नाही तेव्हा त्यास ग्रंथपाल जबाबदार असतो असे नाही तर व्यवस्थापन सुद्धा असू शकते. त्यामुळे व्यवस्थापकांनी योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.
2. ग्रंथालय वाढत जाते तेव्हा तेथील सेवक जेवढे काम अगोदर करत होता तेवढे काम ग्रंथालय वाढल्यानंतर होणार नाही त्यासाठी सेवक वर्ग वाढवला पाहिजे.
3. ग्रंथालय हे प्रायोगिक शास्त्र आहे म्हणजेच वाचकांना सेवा लवकरात लवकर देण्यासाठी वेगवेगळे प्रयोग केले जातात. तेव्हा व्यवस्थापकांनी त्यांना मदत केली पाहिजे असे आठव्या सूत्रानुसार सांगितले.

**ग्रंथालय सेवेचे महत्व:**

आतापर्यंत डॉ. अर्कहार्ट यांनी सूत्रे मांडली त्याचप्रमाणे ग्रंथालय सेवेला किती महत्त्व आहे याची सूत्रे ही मांडली आहेत ती पुढील प्रमाणे

1. वाचकाला व संशोधकाला मिळणाऱ्या माहितीचे मूल्य हे सदैव आर्थिक दृष्ट्या करता येणार नाही उदाहरणच द्यायचे असल्यास संशोधक, डॉक्टर, इंजिनीयर, यांना मिळणारी माहिती ही मूल्यानमध्ये मोजता येत नाही कारण त्याचे मूल्य अमूल्य असते असे अठराव्या सूत्रात सांगितले आहे.
2. तसेच ग्रंथालय हे प्रायोगिक शास्त्र आहे. वाचकांसाठी सेवा देण्यास ग्रंथालयात वेगवेगळे प्रयोग केले जातात व सेवा योग्य वेळी देण्याचा प्रयत्न केला जातो असेही त्यांनी मांडलेले आहे.
3. ग्रंथालयाचे व्यवस्थापन करताना येणाऱ्या गोष्टींचा विचार करावी लागणारी सूत्रे मांडली आहेत तसेच ग्रंथालयाचे महत्त्व वाढवणारी सूत्रे मांडली आहेत.
4. ग्रंथालयामधील ग्रंथालय सेवक, व्यवस्थापक व वाचक यांना वस्तुस्थितीची जाणीव करून देणारी सूत्रे मांडली आहेत.
5. ग्रंथल्यामध्ये नवीन तंत्रज्ञान व पद्धतीचा वापर करताना भविष्याकडे लक्ष देऊन ते कालबाह्य होणार नाही याचा विचार करावा असे ही सूत्र सांगितले आहे.

**निष्कर्ष:**

1. डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी मांडलेली सूत्रे आणि डॉ. अर्कहार्ट यांनी मांडलेल्या काही सूत्रांमध्ये साम्य आहे.
2. ग्रंथालयामध्ये आर्थिक सोअर्स निर्माण करण्याचा मार्ग दाखवण्यात आला आहे.

**संदर्भ:**

1. ज्ञान गंगोत्री मासिक मधील (वर्ष 2 अंक 3 पान नंबर 4 वर्ष 3 अंक1 पान नंबर 63) श्रीमती वेदवती हब्बू यांच्या लेखनावरून
2. देशमुख प्रभाकर व परळकर एस. जी.- व्यवस्थापनाची मूलतत्त्वे. नागपूर: पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, जुलै 1985.
3. Gaikwad, M. N., & Jadhav, Y. G. “Impact of Digital Libraries in E-Learning.